# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानंतर्गत मा.श्री.महेश पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद नाशिक यांची पंचायत समिती त्र्यंबकेश्वर येथे भेट. २५-११-२०२५




आज मा.श्री.महेश पाटील सर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)जिल्हा परिषद नाशिक यांनी पंचायत समिती त्र्यंबकेश्वर कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी खाते प्रमुख व इतर अधिकारी कर्मचारी यांच्या समवेत बैठक घेऊन त्यामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या विषयावर मुद्देनिहाय आढावा घेऊन ग्रामपंचायत अधिकारी यांना आपणास कुठे कमी मार्क पडत आहेत व त्यावर आपले काय नियोजन असून सदर गुण वाढण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन करून समवेतच पंधरावा वित्त आयोग खर्चाबाबत देखील सखोल आढावा घेऊन सर्वांनी शासकीय कपाती करणे बंधनकारक असल्याबाबत सांगून कमी खर्च असलेल्या ग्रामपंचायत बाबत खर्च वाढीसाठी आवश्यक ते सखोल मार्गदर्शन केले तसेच घरकुल मस्टर बाबत आढावा घेण्यात येऊन जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करण्यासाठी देखील सविस्तर मार्गदर्शन केले तसेच संपूर्ण स्वच्छता अभियान कामकाजाबाबत देखील ओला कचरा सुका कचरा याबाबत गावातील शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये प्रबोधन करून त्यानुसार नियोजन करावी अशा सूचना केल्या तसेच प्रत्येक ग्रामपंचायत एक

रस्ता दुरुस्त करणे व एक पानद रस्ता तयार करणे यासाठी देखील सविस्तर आढावा घेऊन सदरचे काम लवकरात लवकर नियोजन करून पूर्ण करण्याच्या सूचना केल्या.




तसेच उपस्थित सर्व खाते प्रमुखांना सुचित केले की मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत आपल्या विभागाशी निगडित असलेल्या सर्व कामकाजाबाबत आपण ग्रामपंचायतीशी संपर्क करून समन्वयाने आपल्या विभागाचे सर्व गुण प्राप्त होतील यासाठी वैयक्तिक प्रयत्न करावेत भविष्यात होणाऱ्या सर्व बैठकांमध्ये याबाबत सविस्तर आढावा घेतल्या जाईल त्यामुळे कोणीही सदर कामाकडे दुर्लक्ष करता कामा नये अशाही सूचना केल्या